# खरा नागरिक

## स्वाध्याय

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**

पहाटेच्या वेळी अभ्यासाचा निरंजनचा अनुभव

↓

१

↓

२

↓

३

↓

४

↓

५

↓

६

↓

७

↓

८

उत्तर: १. सकाळच्या टवटवीत, प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो.

२. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं असतं.

३. प्रसन्न वातावरणामुळे मनही चटकन अभ्यासात लागू शकते.

४. हवेत सुखद गारवा असतो.


५. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असतं.

६. पक्ष्यांचं सुमधुर संगीत साथीला असतंच.

७. या आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा श्लोक चटकन पाठ होतो.

८. न कळलेलं गणित चटकन कळते, त्याची रीतही लक्षात राहते.


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा.

२. अतिशय प्रामाणिकपणे अभ्यास करायचा.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**





उत्तर: १. चिपळूण शहरालगत एका उपनगरात

२. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी

३. दूरदूरच्या नात्यातल्या मावशीच्या घरी


कृ.४. ओघतक्ता पूर्ण करा.




उत्तर: १. निरंजनचे आईवडील त्याच्या लहानपणीच वारले.

२. काही दिवस मामाने त्याचा सांभाळ केला, मग तो निरंजनला चिपळूणला घेऊन आला.

कृ.५. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. रडत बसू नको.

२. शेण, गोठा वगैरे पडतील ती कामं कर.

३. मावशी देईल ते खा आणि इथंच राहा.

४. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.

कृ.६. आकृतिबंध पूर्ण करा.



उत्तर: १. मावशीची परिस्थिती यथातथा असल्याने निरंजन वार लावून जेवायचा.

२. भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले.

३. दररोज एकाच्या घरी दुपारी पाहुणा म्हणून जेवायला जायचा.

४. संध्याकाळी मावशीकडे जे मिळेल त्यावर राहायचा.


**कृ.७. ओघतक्ता पूर्ण करा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **निरंजन गुरुजींवर श्रद्धा ठेवून परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा** | → | १ | → | २ | → | **म्हणून निरंजन झटून अभ्यास करायचा** |

उत्तर: १. त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजी करायचे.

२. 'तुझा पहिला नंबर आहे, तोवरच सारा खर्च करीन, वार लावून देईन' असे गुरुजींनी सांगितले होते.

कृ.८. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. नागरिकांची कर्तव्ये कोणती?

२. उत्तम नागरिक कुणाला म्हणावं?

३. लोकसभा म्हणजे काय?

४. ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो?

कृ.९. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. साडेदहाची परीक्षा होती व नऊ वाजून गेले होते.

२. त्याआधी देशमुखांकडे जेवायला जायचं होतं.


३. केवढंतरी लांब चालायचं होतं.

कृ.१०. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: आपणही मोठे झाल्यावर गाडीतून फिरू.

कृ.११. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. नऊ पन्नासची.

२. कुणीतरी काँक्रीट फोडून रेल्वेचे रूळ वेडेवाकडे करून ठेवले होते.

३. स्टेशनात गाडी थांबवून धरल्यास अपघात टाळता येईल म्हणून.

### कृ.१२. ओघतक्ता पूर्ण करा.

अपघाताची कल्पना आल्यावरची निरंजनची मनोवस्था

↓

१

↓

२

↓

३

**उत्तर:** १. तो नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला.

२. डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली.

३. कानठळ्या बसवणारा आवाज व लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या.

### कृ.१३. ओघतक्ता पूर्ण करा.

निरंजन स्टेशनला गेल्याने हे सर्व होणार होते

↓

१

↓

२

↓

३

↓

४

↓

५

**उत्तर:** १. तीन-चार किलोमीटरवरच्या स्टेशनला गेल्याने परीक्षा बुडणार होती.


२. निरंजन नापास होणार होता.

३. भडसावळे गुरुजींची मदत बंद होणार होती.

४. त्यामुळे शिक्षणही बंद होणार होते.

५. शिक्षणाअभावी मोठेपणी कोकण रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरं राहणार होतं.


**कृ.१४. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती.

२. पाच मिनिटांनी गाडी सुटणार होती.


**कृ.१५. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. निदान पाहून आल्याशिवाय गाडी सोडू नका.

२. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या.


**कृ.१६. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. गाडी दीर्घकाळ थांबवण्याचा आदेश दिला.

२. घटनेचा पंचनामा करू लागले.

**कृ.१७. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. जिल्हाधिकारी

२. जिल्हा पोलीस आयुक्त

३. पोलीस अधीक्षक

४. इतर सर्व अधिकारी

**कृ.१८. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. वर्तमानपत्रात त्याची स्तुती फोटोसकट छापून आली.

२. भीषण अपघात टाळल्याचं श्रेय त्याला देण्यात आलं.

३. मावशीच्या घराकडे मोठमोठी माणसं आली.

४. खुद्द जिल्हाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक व भडसावळे गुरुजी आले.

**कृ.१९. आकृतिबंध पूर्ण करा.**



**उत्तर:** १. खास बाब म्हणून निरंजनची नागरिकशास्त्राची परीक्षा घेतली गेली.

२. जिल्हाधिकाऱ्यांनी त्याला सरकारी वसतिगृहात प्रवेश दिला.

३. वह्यापुस्तकांच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती मिळाली.

**कृ.२०. 'प्रसंगावधानता' या विषयावर संवादलेखन करा.**

**उत्तर:** **कल्पेश** : नीता, तुला संदीपची कामगिरी समजली का?

**नीता** : कसली कामगिरी? तूच सांग.

**कल्पेश** : अगं, चार दिवसांपूर्वी आपल्या सहाव्या मजल्यावरच्या पवारकाकांकडे आग लागली होती. तेव्हा संदीप होता; म्हणून आपण सगळे जिवंत आहोत, नाहीतर पवारांसोबत आपणही सगळे भस्मसात झालो असतो.

**नीता** : बापरे ! अशी कशी लागली आग? आणि संदीपने काय केलं?

**कल्पेश** : पवारकाकांच्या इलेक्ट्रिक गिझरमधून आग भडकली. थोडा आवाज झाला. संदीप तिथेच होता. त्याने तडक तळमजला गाठला आणि सोसायटीच्या मीटर बॉक्सजवळचा, मुख्य वीजपुरवठा करणारा स्विच बंद केला.

**नीता** : अरे, केवढी हुशारी दाखवली त्याने.

**कल्पेश :** हो ना! आग फक्त पवारकाकांच्या बाथरूमपुरतीच राहिली; कारण ती पसरायच्या आतच संदीपने वीज पुरवठा खंडित केला.

**नीता :** संदीपच्या प्रसंगावधानतेची दाद द्यायला हवी. चल, त्याला भेटून येऊ.

**कृ.२१. 'सतर्कतेमुळेच सुरक्षितता प्राप्त होते,' याविषयी तुमचे मत मांडा.**

**उत्तर:** सतर्कतेमुळेच सुरक्षितता प्राप्त करता येते, ही गोष्ट जागोजागी आपल्या प्रत्ययास येते. अनेकदा रेल्वे, बसगाड्यांतून प्रवास करताना पाकीटमार, साखळीचोर पकडले जातात ते प्रवाशांच्या सतर्कतेमुळेच. तसेच, बॉम्बचा संशय आल्यामुळे सतर्क प्रवाशांनी पोलिसांना कळविले, तेथे खरोखरच बॉम्ब निघाला व मोठमोठे दहशतवादी हल्ल्यांचे कट उधळले गेल्याच्या आजवर अनेक घटना घडल्या आहेत. हे सर्व घडून येते ते नागरिकांच्या सतर्कतेमुळे, प्रसंगावधानतेमुळे. संशयित व्यक्ती, त्यांच्या संशयित हालचाली, घातपाताचे प्रकार किंवा निव्वळ अपघात टाळण्यासाठी सर्वांनी समाजात वावरताना सावधपणे, सतर्कतेने आपले प्रसंगावधान राखून वागणे आवश्यक आहे.

## क्र.२२.पाठावर आधारित प्रश्न

**१. पुलावर घडू शकणारी दुर्घटना घडू नये म्हणून निरंजनने कसे प्रयत्न केले?**

**उत्तर:** सुहास बारटक्के लिखित 'खरा नागरिक' या कथेतील निरंजन कष्टाळू, प्रामाणिक तसेच हुशार विद्यार्थी होता. नागरिकशास्त्राचा शेवटचा पेपर देण्यासाठी तो घरून निघाला होता. नेहमीच्या वाटेत लागणाऱ्या नदीवर असलेल्या रेल्वेच्या पुलावरून चालताना त्याचे रुळाखाली पडलेल्या भगदाडाकडे लक्ष गेले. कुणीतरी काँक्रीट फोडून रेल्वेचे रूळ वेडेवाकडे करून ठेवले होते. आपल्या परीक्षेचा विचार न करता तो स्टेशनवर धावत गेला व स्टेशनमास्तरांना भेटून त्याने संभाव्य अपघाताची कल्पना दिली. स्टेशनमास्तरांचा या गोष्टीवर विश्वास बसत नाही, हे दिसताच त्याने आपले बोलणे चुकीचे ठरल्यास पोलिसांच्या स्वाधीन होण्याची तयारी दाखवली. स्टेशनमास्तरांनी पुलाची पाहणी केली तेव्हा त्यांना घडू शकणाऱ्या अपघाताची तीव्रता लक्षात आली व त्यांनी गाडी दीर्घकाळ थांबवण्याचा इशारा दिला. अशा प्रकारे, पुलावर घडू शकणारी दुर्घटना घडू नये म्हणून निरंजनने शर्थीचे प्रयत्न केले.

२. **पाठाला दिलेल्या 'खरा नागरिक' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'खरा नागरिक' या पाठातून लेखक सुहास बारटक्के यांनी खऱ्या, सच्च्या नागरिकाची ओळख सांगणाऱ्या निरंजनची साहसी कथा मांडली आहे.

निरंजन मावशीकडे राहणारा, पडेल ते काम करणारा, वार लावून जेवणारा, कष्टाळू, प्रामाणिक, अनाथ मुलगा होता. शेवटच्या नागरिकशास्त्राच्या पेपरसाठी घरातून निघाल्यावर रेल्वेच्या पुलावर पोहोचताच त्याला रुळाखाली पडलेले मोठे भगदाड दिसले. होऊ शकणाऱ्या अपघाताची भीषणता त्याच्या लक्षात आली व त्याने स्टेशनकडे धाव घेतली. स्टेशनमास्तरांना गाठून त्याने सर्व सांगितले. निरंजनने खूप आर्जवे केल्यानंतर स्टेशनमास्तरांनी तेथे जाऊन पाहिले आणि अपघाताचे गांभीर्य त्यांच्या लक्षात आले. त्यांनी रेल्वेगाडी थांबवली. एवढा मोठा अपघात निरंजनच्या चाणाक्षपणामुळे टळला म्हणून त्याचे कौतुक झाले. 'नागरिकशास्त्राच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झालास' असे म्हणून गुरुजींनी त्याला हृदयाशी धरले. त्यामुळे खऱ्या नागरिकाचे गुण आत्मसात केलेल्या निरंजनच्या गोष्टीसाठी 'खरा नागरिक' हेच शीर्षक समर्पक वाटते.